# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

(निम्न शिक्षण विद्याशाखा)

पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रम

वार्षिक परीक्षा : एप्रिल – 2016

विषय :– गाय म्हैस पालन व दुग्धोत्पादन

| | | | |
|---|---|---|---|
| वर्ष | : द्वितीय | एकुण गुण | : 100 |
| दिनांक | : 04/04 /2016 | वेळ | : 3 तास |

सुचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**प्र. 1 ला (अ) रिकाम्या जागा भरा :–** (10)

1) एका वासराला सामान्यपणे ............ चौ.फु. बांधकाम करावे
2) निरोगी गायी–म्हशी व्यायल्यापासून ................. दिवसांनी माजावर येऊन राहतात.
3) म्हशी साधारणपणे .................. वर्षात माजावर येतात.
4) सामान्यपणे माजाच्या ................. तासात कृत्रिम रेतन करवुन घ्यावे
5) ................ आठवडे वयात वासरात शिंगकळ्या खुडतात.
6) जनावर विण्याच्या वेळी ................. हा संप्रेरक तयार होतो.
7) दुध उत्पादनात खादयावर ............... टक्के खर्च होतो.
8) साहीवाल व ब्राउन स्विस संकरणापासून ............ही संकरीत जात तयार झालेली आहे.
9) म्हशीच्या पारड्याला ............... म्हणतात.
10) ...................... या म्हशीच्या शिंगाचा आकार कोयत्या सारखा असतो.

**(ब) व्याख्या लिहा :–** (05)

1) संकरीकरण 2) दुध 3) निर्जतूकीकरण
4) संसर्गजन्य आजार 5) कृत्रिम रेतन

**(क) जोडया लावा.** (05)

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| 1) मॅलेथिआन | अ) पर्णकृमीनाशक |
| 2) फिनाईल | ब) डिटर्जंट |
| 3) लॅक्टोज | क) किटकनाशक |
| 4) डिस्टोडीन | ड) दुग्धशर्करा |
| 5) सोडीयम कार्बोनेट | इ) जंतुनाशक |

**प्र. 2 रा** (अ) नवजात वासरांत चिकाचे महत्व सांगुन चिकास पयार्य म्हणुन कृत्रिम चीक तयार करणे यावर माहिती लिहा. (08)

(ब) दुध उत्पादनात नोंदीचे महत्व व विविध नोंदवह्या विषयी सविस्तर माहिती लिहा. (08)

**प्र. 3 रा** (अ) भारतात उपयुक्त ठरलेल्या विदेशी गायीच्या जाती लिहून जर्सी जातीच्या गायीचे मुळस्थान, शारीरीक वैशिष्टये व दुध उत्पादन यावर माहिती लिहा. (08)

(ब) म्हैस विण्याची लक्षणे लिहुन, विण्यानंतर घ्यावयाची काळजी यावर सविस्तर महिती लिहा. (08)

**प्र. 4 था** (अ) स्वच्छ दुध उत्पादनाचे महत्व सविस्तर लिहा. (08)

(ब) वळुची देखभाल व संगोपन यावर खालील मुद्यानुरूप माहिती लिहा. (नाकात बांगडी टाकणे, व्यायाम, स्वतंत्र गोठा व फळविण्याचे प्रमाण) (08)

**प्र. 5 वा** (अ) बैल व ईतर भारवाहू जनावरांची देखभाल व संगोपन याबाबत माहिती लिहा. (08)

(ब) गायीचे लसीकरण वेळापत्रक लिहा. (08)

**प्र. 6 वा** टिपा लिहा (कोणतेही चार) (16)

1) बंदिस्त गोठा 2) कासेची रचना 3) नोंदवहीचे महत्व
4) माजाची लक्षणे 5) म्हैसपालन

.....................................

# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

(निम्न शिक्षण विद्याशाखा)

पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रम

वार्षिक परीक्षा – 2014

विषय :– गाय म्हैस पालन व दुग्धोत्पादन

वर्ष : द्वितीय — एकुण गुण : 100

दिनांक : 05/05/2014 — वेळ : 3 तास

सुचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

---

**प्र. 1 ला (अ)** एका वाक्यात उत्तरे लिहा. (10)

1) बुळकांडी हा रोग कोणत्या विषाणु पासुन होतो ?
2) मैहसना ही म्हशीची जात कोणत्या संकरणापासुन तयार कली ?
3) जागतीक मानकानुसार प्रतिमिली किती लाखापेक्षा जास्त जिवाणु असु नये असा मापदंड आहे.
4) गुरांच्या शरीराची वाढ कशावर अवलंबुन असते ?
5) दुधाची चव खारट का असते ?
6) सर्वात जास्त दुध देणारी विदेशी गाय कोणती ?
7) एन्ट्रोटॉक्सीमीया हा रोग कोणत्या प्राण्यात आढळतो ?
8) भारताचा दुध उत्पादनात कोणताक्रमांक लागतो ?
9) चिकामध्ये दुधापेक्षा किती पट प्रथिने आढळतात ?
10) गौळव आणि गीर या जातीचे मुळ स्थान कोणते ?

**(ब)** जोडया लावा. (05)

| | |
|---|---|
| 1) म्हशीची जात | अ) नाकात बांगडी घालणे |
| 2) शिंग कळया खुंटणे | ब) हिरवी वैरण |
| 3) वळु | क) पानाकुर |
| 4) मुरघास | ड) नागपूरी |
| 5) जंतनाशक | इ) कॉस्टीक पोटॅश |

**क)** प्रत्येकी दोन उदाहरणे लिहा. (05)

1) माजीची दोन प्रमुख लक्षणे.
2) गाय आटविण्याच्या पद्धती.
3) जनावरांच्या प्रतिबंधक लसींची नावे .
4) गोठयामध्ये जनावरे बांधण्याच्या दोन पद्धती.
5) भारतातील उत्कृष्ट म्हशीच्या दोन दुधाळ जाती.

**प्र. 2 रा (अ)** छाटणी म्हणजे काय ? जनावरांची छाटणी कां करावी याबद्दल सविस्तर माहीती लिहा. (08)

**(ब)** निरोगी व रोगी जनांवरांची तक्त्याद्वारे तुलना करा. (08)

**प्र. 3 रा (अ)** गोठाचे निर्जतुतीकरण म्हणजे काय ? गोठयाची स्वच्छता व निर्जतुतीकरण का व कसे करावे. (08)

**(ब)** कष्ट करणाऱ्या बैलांची देखभाल व संगोपन याबद्द सविस्तर माहीती लिहा. (08)

**प्र. 4 था (अ)** दुध व्यवसायामध्ये दुध उत्पादनावर होणाऱ्या खर्चाच्या बाबी कोणत्या याबद्द सविस्तर वर्णन करा. (08)

**(ब)** दुध म्हणजे काय ? दुधातील घटक कोणते, त्याबाबत सविस्तर माहीती विशद करा. (08)

**प्र. 5 वा (अ)** दुधाळ गाय किंवा म्हशीची निवड कशी करावी, हे मुद्दे निहाय लिहा. (08)

**(ब)** दुधाकरीता प्रसिद्ध भारतीय म्हशींचे नावे सांगुण दुध देणाऱ्या दुधाळ म्हशींचे वर्णन करा. (08)

**प्र. 6 वा** टिपा लिहा (कोणतेही चार) (16)

1) संकरणाचे फायदे
2) आबोंवन
3) जंतनाशकाचे महत्व व वेळापत्रक
4) दुग्ध उत्पादनात नोंदीचे महत्व
5) जनांवरात संसर्गजन्य रोगाची साथ सुरू झाल्यास घ्यावयाची काळजी

# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापाठ, नागपुर

( निम्न शिक्षण विद्याशाखा)

पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रम

वार्षिक परीक्षा – 2013

विषय :– गाय म्हैस पालन व दुग्धोत्पादन

| | | | |
|---|---|---|---|
| वर्ष | : द्वितीय | एकुण गुण | : 100 |
| दिनांक | : 10. 06. 2013 | वेळ | : 3 तास |

---

**सुचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

---

**प्र. 1 ला (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा :–** (10)

1) भारतातील विदेशी गायीच्या जातीचे नावे लिहा.
2) म्हशीच्या माज किती तास राहतो ?
3) गायीचा व म्हशीचा गाभण काळ किती दिवसाचा असतो ?
4) दुधा द्वारे प्रसारीत होणारे रोग कोणते ?
5) वासरे संगोपनाच्या पध्दती कोणत्या ?
6) दुधाळ म्हशीच्या जाती कोणत्या ?
7) नवजात वासरांना चिक किती पाजावा ?
8) गाय आटविण्याच्या पध्दती कोणत्या ?
9) नवजात वासरांची नाळ कापण्याकरीता कोणते जंतुनाशक वापरावे ?
10) गाय व म्हशीचा भाकड काळ किती दिवसाचा असतो ?

**(ब) चुकीची विधाने दुरूस्त करून लिहा :–** (05)

1) म्हशीमध्ये भाकड काळ 3 ते 4 महीने असतो.
2) खिल्लार हि दुधाळ जात आहे.
3) चिकामुळे वासरांची रोगप्रतीकार शक्ती कमी होते.
4) जंत हा सर्वाना परीचीत असनारा विषाणू आहे.
5) घरसर्प या रोगाची लस हिवाळयात देतात.

**क) जोडया लावा.** (05)

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | म्हशीची जात | अ) | पिपरॉझीन |
| 2) | जंतनाशक | ब) | जोड उददेशिय गाय |
| 3) | वळू | क) | हिरवी वैरण |
| 4) | देवणी | ड) | नाकात बांगडी घालने |
| 5) | मुरघास | ई) | म्हैसाना |

**प्र. 2 रा** अ) भारतातील म्हशीच्या जातीचे नावे लिहा. त्या पैकी विदर्भातील म्हशीच्या जातीचे वर्णन करून माहीती लिहा. (16)

**प्र. 3 रा** अ) भारतातील उपयुक्त असलेले विदेशी गायीची नावे सांगा ? कोणत्याही एका उत्कृष्ट दुध देणाऱ्या विदेशी गायीचे वर्णन करा. (08)

ब) नवजात वासरे व रेडकु यांची काळजी व व्यवस्थापन. (08)

**प्र. 4 था** अ) नुकत्याच व्यालेल्या गाय–म्हशीची स्वच्छता व देखभाल कशी करावी याचे वर्णन करा. (08)

ब) दुध म्हणजे काय व दुधातील घटक कोणते व त्याचे वर्णन करा. (08)

**प्र. 5 वा** अ) बैलाची देखभाल व संगोपन कसे व का करावे या बद्दल सविस्तर वर्णन करा. (08)

ब) वळुची निवड करतांना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवून निवड करावी. (08)

**प्र. 6 वा** टिपा लिहा. (कोणतेही चार) (16)

1) संकरणाचे फायदे.
2) चिकाचे महत्व सांगुन चिकास पर्याय लिहा.
3) छाटणीचे महत्व.
4) दुधाळ गायीची निवड.
5) भाकड गायी, म्हशीचे संगोपन.

..............................

# महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापिठ,नागपुर

(निम्न शिक्षण विभाग)

पशुधन व्यवस्थापन व दुग्धोतपादन पदविका अभ्यासकम

वार्षीक परीक्षा मे – 2012

वर्ष – प्रथम | विषय –पशुसंवर्धन | एकुण गुण –100

दिनांक :02/05/2012 | वेळ –3 तास

---

सुचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

---

**प्रश्न 1 ला**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.** (10)

1) आजारी जनावरांचे प्रमुख लक्षण लिहा.
2) अस्थाची स्वरुपाची ओळखचिन्हे लिहा.
3) मुका माज कोणत्या प्राण्यात आढळतो ?
4) जनावरांना दररोज पिण्यासाठी व धुण्यासाठी किती पाण्याची आवश्यकता असते?
5) जनावरांना तोंडखुरी –पायखुरी लस कोणत्या ऋतुत देतात ?
6) जनावरांचे वय कशावरुन ओळखतात?
7) शिंगकळया नष्ट करण्याची पध्दत कोणती ?
8) गोठयाचे प्रकाराची दोन नावे लिहा.
9) दुध दोहण्याची उत्तम पध्दत कोणती ?
10) जनावरांना खाली पाडण्याची उत्तम पध्दत कोणती ?

**ब) रिकाम्या जागा भरा.** (5)

1) खच्चीकरण करण्याकरीता ................उपकरणाचा उपयोग करतात.
2) गायीचा गाभणकाळ ................दिवसाचा उपयोग करतात.
3) शिंगकळया खुडण्याकरीता ................रसायन वापरतात.
4) निरोगी जनावरांचे शरीराचे सामान्य तापमान ................ असते.
5) गरीबांची गाय ................या प्राण्याला म्हणतात.

**क) प्रत्येकी दोन उदाहरणे लिहा .** (5)

1) वासरे संगोपनाच्या पध्दती.
2) जनावर नियंत्रणाच्या पध्दती.
3) जनावरांच्या खोडी.
4) जंतनाशक औषधांची दोन नावे लिहा.
5) लसीचे प्रकार.

**प्रश्न 2 रा** **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

1) प्रदर्शन व बाजारांसाठी जनावरांची तयारी कशी कराल ते सविस्तर लिहा. (8)
2) गायी म्हशीच्या विण्याची लक्षणे लिहुन पुर्व तयारी कशी कराल ते लिहा. (8)

**प्रश्न 3 रा** **खालील प्रश्नांची थोडक्यात प्रश्नांची उत्तरे लिहा.** (16)

1) जनावरांची छाटणी का करावी ?
2) पैदासी वळुची काळजी कशी घ्याल ?
3) गोठयाचे निर्जतुकीरण कसे कराल?
4) जनावरांना पाण्याची आवश्यकता का असते?

**प्रश्न 4 था** **जनावरांचे गोठे बांधतांना कोणकोणत्या गोष्टी विचारात घ्याल ते सविस्तर वर्णन करा.** (16)

**प्रश्न 5 वा** **खालील प्रश्नाची थोडक्यात प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** (16)

1) व्यालेल्या जनावरांची देखभाल कशी कराल ते सविस्तर लिहा.
2) स्थायी स्वरुपाची ओळखचिन्हे देण्याच्या पध्दती सांगुन एक पध्दत सविस्तर लिहा.
3) जनावरांचे वय ठरविण्याचे पध्दती सांगुन एक पध्दत सविस्तर लिहा.

**प्रश्न 6 वा** **थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही चार)** (16)

1) जनावरांची हाताळणी.
2) गाभण गायीचा आहार
3) नोंदवहीचे महत्व .
4) बंदिस्त गोठा.
5) भाकड जनावरांची देखभाल.